# अंगणवाडी मदतनीस या मानधनी रिक्त पदांची भरती जाहिरात

जाहिरात क्रमांक: बाविप्रअना/शहर/आस्था/मदतनीस/भरती/२०२३-२४/२१८ दिनांक १६/०६/२०२३ महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रं: एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/ का.६ दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३ नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना, हया केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, (ना) अकोला या प्रकल्प कार्यालयातील अंगणवाडी केंद्रातील रिक्त मदतनीस या मानधनी पदासाठी प्रकल्प महानगरपालिका कार्यक्षेत्रातून पात्र महिला उमेदवारांकडून सरळ नियुक्तीने (By Nomination) दिनांक १०/०७/२०२३ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

**१. पदाचे नांव** :- **अंगणवाडी मदतनीस (मानधनी पद)**

**२. रिक्त पदांची संख्या** :- ६० पैकी **हिंदी भाषीक — ०५, ऊर्दु भाषीक — २०**

( रिक्त पदाचे सविस्तर तपशिल कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेले आहेत. मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा उदा. ऊर्दु, हिंदी बाबत उमेदवाराने अर्जावर एकाच भाषेचा प्रकार स्पष्टपणे नमूद करावा. तसेच ज्या भाषेकरीता अर्ज केला असेल त्याच भाषेचा अर्ज ग्राहय धरल्या जाईल, भाषेचा प्रकार नमूद न केल्यास मराठी भाषेचा अर्ज समजण्यात येईल.)तसेच हिंदी किंवा उर्दू पदासाठी निकषानुसार उमेदवार प्राप्त न झाल्यास मराठी प्राप्त उमेदवाराचे पद भरण्यात येईल.

**उमेदवारांसाठी अटी व शर्ती -**

१. मानधन :- अंगणवाडी मदतनीस पदासाठी रू.५५००/- दरमहा एकत्रित मानधन मिळेल. तसेच वेळावेळी शासन आदेशानूसार मानधन वाढ देय राहील.

२. शैक्षणिक पात्रता :- अंगणवाडी मदतनीस पदासाठी महिला उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) आवश्यक राहील. उच्च शिक्षण असल्यास (पदवी, पदवीधर/ DEd/Bed/MSCIT) शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेच्या आवश्यक कागदपत्रांच्या व गुणपत्रिकांसह सर्व विषयाच्या सत्य प्रती सोबत जोडाव्यात.त्यानूसार गुणांकन करण्यात येईल.

3. वास्तव्याची अट :- उमेदवार ही अकोला महानगरपालिका अंतर्गत कार्यक्षेत्रातील, बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) अकोला शहर महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रातीलच स्थानिक रहीवासी असावी. यांच्या महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्थानिक रहिवासी असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे रहिवासी प्रमाणपत्र तसेच इतर पुरावा उदा. मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, विद्युत बील/कर पावती याची सत्यप्रत जोडावी.

४. वयाची अट :- जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास म्हणजे २० जुन २०२३ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे आणि विधवा उमेदवारासाठी वयोमर्यादा कमाल ४० वर्षे राहिल. वयाचा पुरावा म्हणून टि.सी./बोर्ड प्रमाणपत्र/जन्म दाखला जोडवा.

५. लहान कुटूंब :- वरील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास लहान कुटुंबाची अट लागू राहील. उमेदवारास दोन पेक्षाजास्त अपत्ये नसावीत. अर्जा सोबत परिशिष्ट ब मधील नमुन्यात लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहील.

६. भाषेचे ज्ञान :- ज्या अंगणवाडी मध्ये ५० टक्के पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उदा. ऊर्दु, हिंदी, इत्यादी पैकी एक भाषा) बोलणारी असतील, त्याठिकाणी त्या पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहिता व वाचता येणे) आवश्यक राहील. तथापी अशा उमेदवाराने इयत्ता १० वी किंवा १० वी पेक्षा जास्त शैक्षणिक अर्हते पैकी (परिशिष्ठ-अ) किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असण आवश्यक राहिल.

७. विधवा/ अनाथ उमेदवाराबाबत :- विधवा व अनाथ उमेदवार असल्यास उमेदवाराने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र / दाखला सोबत जोडावा. विधवा असल्यास पतीचा मृत्यू दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे. त्यानूसार गुणांकन करण्यात येईल.

८. मागासवर्ग प्रवर्ग :- अनुसूचितजाती/जमाती/ इतरमागासप्रवर्ग/ विमुक्तजाती/ भटक्याजमाती/ आर्थीकदृष्टया दुर्बलघटक/ विशेष मागास प्रवर्ग या उमेदवाराने सक्षम ( उपविभागीय अधिकारी ) प्राधिकारी यांचेकडील स्वत:चे नावाचे साक्षांकीत प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी. त्यानूसार गुणांकन करण्यात येईल.

www.govnokri.in

९. अनुभव :- शासकीय यंत्रणेतील अंगणवाडी सेविका /मिनी अंगणवाडी सेवीका/ मदतनीस म्हणून कमीत कमी दोन वर्ष अनुभव असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या साक्षांकीत प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.

१०. जाहिरात प्रसिध्दी दिनांक :- २० जुन २०२३

११. अर्ज स्विकारण्याची व अंतिम दिनांक, पत्ता :- अर्ज स्विकारण्याचा दिनांक २६/०६/२०२३ ते दिनांक १०/०७/२०२३ पर्यंत वेळ ( दि. १०/०७/२०२३ रोजी सायं. ०५:३० वाजेपर्यंत) बाल विकास प्रकल्प अधिकारी, (ना) अकोला शहर पत्ता- बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) अकोला द्वारा श्री.सुरेश पांडुरंग पाटकर नवीन बस स्टॅन्ड च्या मागे आय.टी.आय जवळ महसूल कॉलनी अकोला .४४४००१ या पत्यावर अर्ज स्विकारण्यात येतील.

१२. अर्ज करण्याची पध्दत :- अर्जाचा विहित नमुना कार्यालयात उपलब्ध असून जहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून १० दिवसामध्यें (सुटटीचे दिवस वगळून) या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष येवून अर्जाचा नमूना (पदभरतीच्या अटी व शर्तीसह) स्विकारुन कार्यालयाने दिलेल्या विहीत नमुण्यातील अर्ज विहित वेळेत सादर करावा. पोस्टाने आलेले अर्ज तथा उशिरा प्राप्त होणारे अर्जाचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

१३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३९६ – २८/१०/२०२१ नुसार ४ मदतनीस पदे भरणे करिता जाहिरात देण्यात आली होती ती प्रशासकीय करणामुळे रद्द समजण्यात यावी.ज्या उमेदवारांनी या पदा करीता अर्ज केले होते त्यांनी परत नवीन निकषानुसार अर्ज करावे.

१४. अधिकाराबाबत :- काही प्रशासकीय अथवा तांत्रीक अडचणी उदभवल्यास सदर निवड प्रक्रिया रद्द करणे, पदाच्या संख्येत बदल करणे, निवड प्रक्रीयेबाबतचे संपूर्ण अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत. जाहिराती बाबतच्या इतर सविस्तर अटी व शर्ती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या आहेत.

टीप :- उमेदवाराने अर्ज या कार्यालयात दाखल केल्यानंतर सदरील अर्जाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे पुरवणी दस्तावेज किंवा कागदपत्रे स्विकारले जाणार नाही.

www.govnokri.in

( सी.बी.चेके)
**बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना)**
**अकोला**

## इतर सविस्तर अटी व शर्ती –

१. प्राथमिक यादी :- अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांका पासून १५ दिवसात प्राथमिक गुणवत्ता यादी कार्यालयात नोटीस बोर्डवर प्रसिदध करण्यात येईल. तथापी गुणवत्ता पडताळणी समिती ची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच गुणवत्ता यादी प्रसिध्दी करण्यात येईल.

२. मदतनीस या रिक्त पदासाठी भाषेच्या प्रकारानुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून परिशिष्ठ- ब प्रमाणे गुणांकनानुसार सर्वात जास्त मिळालेले गुण याआधारे निवड सुची (Merit List) तयार करण्यात येवून नोटीस बोर्डावर लावण्यात येईल.

३. निवड प्रक्रिये विरूध्द तक्रार/ अपील :- १) प्राथमिक गुणानुक्रम यादीतील कोणत्याही उमेदवाराची वैयक्तीक माहिती खोटी असल्याची तक्रार किंवा इतर बाबी बाबत तक्रार असल्यास यादी प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) अकोला शहर यांच्याकडे उमेदवाराने लेखी स्वरूपात तक्रार करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही. २) निवड यादी घोषित झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मा. विभागीय उपआयुक्त महिला व बाल विकास अमरावती विभाग अमरावती यांच्याकडे अपील दाखल करता येईल.

४. प्रतिक्षायादी :- जर उमेदवार हे नियुक्ती दिनांकाच्या आदेशापासून ३० दिवसात रूजू झाले नाही किंवा त्यास अपात्र ठरविण्यात आले तर प्रतिक्षा यादीतील गुणानूक्रमांका नुसार नियुक्ती देण्यात येईल व सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहिर झाल्या पासून एक वर्षा पर्यंत वैध राहिल.

५. बदली :- अंगणवाडी मदतनीस हे एकाकी पद असल्यामुळे तसेच स्थानिक रहिवाशी असावी या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही. तसेच प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६. सेवा समाप्तीसाठी वयाची अट :- सदर भरती प्रक्रीयने नियुक्त होणाऱ्या अंगणवाडी मदतनिसयांची सेवा वयाची ६० वर्षे होई पर्यत किंवा त्या शारिरीकदृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास या पैकी जे आधी घडेल तोपर्यत सुरु राहिल.

७. उमेदवाराने विवाहपुर्वीचे व विवाहानंतरचे नावांत बदल असल्यास त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र किंवा नावात बदलाचे राजपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी अर्जासोबत जोडावे.

८. उमेदवार दिलेल्या पत्यावर राहतात किंवा नाही याची प्रत्यक्ष सत्यता पडताळणी करण्यात येईल, तसे आढळून न आलेल्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

९. उमेदवाराचा वास्तव्याचा पत्ता हा बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) अकोला शहर या कार्यक्षेत्रातील असणे आवश्यक आहे. प्रकल्पाच्या महानगरपालिका कार्यक्षेत्राबाहेरील अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रति साक्षांकीत केलेल्या असाव्यात. जाहिरातील सर्व अटी व शर्ती वेळोवेळी येणारे परिपत्रक/ शासननिर्णयानुसार राहतील.

१०. अर्जासोबत दिलेली माहिती व कागदपत्रे खोटी आढळल्यास अथवा खोटे दस्ताऐवज सादर केल्याचे निदर्शनास आल्यास निवडी नंतरही उमेदवाराची नियुक्ती रदद करण्यात येईल.

११. पत्रव्यवहार:- भरती प्रक्रिये सबंधी अर्जदारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सूचना जहिराती मधील अटी व शर्ती प्रमाणे असून वेळोवेळी सूचना कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

( सी.बी.चेके)
बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना)
अकोला

www.govnokri.in

# अर्जाचा नमूना

| अर्जदाराचा फोटो या चौकानात चिटकवावा |
|---|

| अर्जदारांची स्वाक्षरी |
|---|

प्रति,
बाल विकास प्रकल्प अधिकारी, (ना)
अकोला शहर- मध्य

**विषय :- अंगणवाडी मदतनीस या पदा करिता अर्ज**
**भाषेचा प्रकार :-** ----------------

मी खाली सही करणार अंगणवाडी मदतनीस या पदासाठी अर्ज करु इच्छित आहे.त्यासाठी मी माझी संपूर्ण सत्य माहिती खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१) उमेदवाराचे संपुर्ण नाव :- १) लग्नापूर्वीचे नाव :--------------------------------------------------------------
२) लग्नानतंरचे नाव :--------------------------------------------------------------
२ ) रहिवाशी संपुर्ण पत्ता : ------------------------------------------------------------------------------

३) जन्मतारीख :- ----/----/-------- जाहिरातीचे दिनांकास वय - ------- वर्षे ------ महिने ------ दिवस
४) जात व संवर्ग:- ------------------------
मागासवर्गीय असल्यास (अनु.जाती/अनु.जमाती/इमाव/विमुक्त जाती /भटक्याजमाती/आर्थीक दुष्टया दुर्बल घटक/ विमाप्र) योग्य ठिकाणी ✓ खून करावी.
५) विवाहीत/ अविवाहीत :----------------- ६) अनाथ/विधवा:-----------------------
७) लहान कुटूंब प्रमाणपत्र :- ------------- हयात अपत्याची संख्या : ---------
८) शैक्षणिकपात्रता : ---------------- ९) उमेदवारांचे संपर्क क्रमांक :------------------------

| अ.क्र. | शिक्षण | वर्ष | शाळेचे/ बोर्डाचे नांव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता बारावी | | | | | |
| २ | पदवीधर | | | | | |
| ३ | पदव्युत्तर | | | | | |
| ४ | डि एड. | | | | | |
| ५ | बी. एड. | | | | | |
| ६ | एम.एस.सी.आय.टी. | | | | | |

१०) नमूद शासन मान्य संस्थेतील अंगणवाडी सेवीका/ मदतनीस/ मिनी अंगणवाडी सेवीका म्हणून अनुभव आहे काय ? होय/नाही. अनुभव असल्यास कालावधी : -------------------------------
११) शासकीय मान्यता प्राप्त संस्थेचे संगणक परिक्षा उतीर्ण प्रमाणपत्र (MSCIT) आहे काय ? --------------
(असल्यास प्रमाणपत्राची सांक्षाकिंत प्रत सोबत जोडावी )

वरील संपूर्ण माहिती खरी असून ती चूकीची आढळल्यास माझा अर्ज फेटाळला जाईल किंवा माझी निवड झाल्यानंतरही निवड रद्द करण्यात येईल याची मला पूर्ण जाणीव आहे. तसेच जर माझी निवड अंगणवाडी मदतनीस म्हणुन झाली तर बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) अकोला शहर या कार्यालया अंतर्गत कार्यरत गुणानुक्रमे देण्यात येणाऱ्या कोणत्याही अंगणवाडीवर काम करण्यास मी तयारआहे.

(उमेदवाराची सही)
दिनांक - / /२०२३ संपूर्ण नाव -------------------------------

## परिशिष्ठ ब
## लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र

मीश्रीमती-------------------------------------------------------------------------------------------------------------

श्री-----------------------------------------------------------यांची पत्नी / मूलगी/ विधवा वय------------वर्ष,

राहणार-------------------------------------------------------------------------------------------------------------

याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते की,

१) मी ------------------------------------------------------ पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला खालील प्रमाणे अपत्ये आहेत.

| अ.क्र. | मुलाचे/ मुलीचे नाव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

३) हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोन पेक्षा अधिक मूले झाल्यास, अंगणवाडी सेविका/ मदतनीस या मानधनी पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास किंवा सेवेतून कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

४) मला दोन पेक्षा जास्त अपत्य (दत्तक अपत्यांसह) होणार नाही त्यासाठी मी कुटुंब नियोजन करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण:- अकोला
दिनांक :- / /२०२३

( उमेदवाराची सही )
संपूर्णनाव --------------------------------

बाल विकास  प्रकल्प अधिकारी (ना)अकोला शहर या प्रकल्प ( महानगरपालिका कार्यक्षेत्र पूर्ण.)

( सी.बी.चेके)
बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना)
अकोला